नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८४ Issue - 284 | वार शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ Blow- Friday Date 6 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.९ टक्के दराने वाढणार

## दरडोई उत्पन्न ३.४७ लाखांवर; आर्थिक पाहणी अहवालातून समोर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून चालू आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६' अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमध्ये वाढलेली गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. हा अहवाल विधानसभेत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी तर विधानपरिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला.

देशाच्या जीडीपीत महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा

आर्थिक पाहणी अहवालानुसार, २०२५-२६ मध्ये राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ५१,००,५९७ कोटी रुपये अपेक्षित आहे, तर वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी रुपये इतके राहण्याचा अंदाज आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपये अपेक्षित असून ते अखिल भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या (२,१९,५७५ रुपये) तुलनेत लक्षणीय जास्त आहे. पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०२४-२५ मध्ये देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे.

कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील वाढ

सन २०२४-२५ मध्ये विविध क्षेत्रांत वाढ अपेक्षित आहे. कृषी व संलग्न क्षेत्रात ३.४ टक्के वाढ अपेक्षित आहे, तर उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि सेवा क्षेत्रात ९.० टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. सेवा क्षेत्रातील वेगवान वाढ राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

राज्यात चलनवाढ नियंत्रणात

एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ४०१.८ तर नागरी भागातील ३७६.७ इतका होता. या काळात ग्रामीण भागात २.० टक्के आणि नागरी भागात १.५ टक्के चलनवाढ नोंदविण्यात आली. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दरातील सुधारणांमुळे किमतींवर सकारात्मक परिणाम झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार- डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यात २७०.८४ लाख शिधापत्रिका धारक असून ५१,६३६ रास्त भाव दुकाने कार्यरत आहेत. 'शिवभोजन' योजनेअंतर्गत नोव्हेंबर २०२५ पर्यंत ४.०९ कोटी शिवभोजन थाळ्यांचे वितरण करण्यात आले आहे.

सामाजिक विकासातही प्रगती

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागरी भागात ८.७५ लाख तर ग्रामीण भागात १६.०४ लाख घरे पूर्ण झाली आहेत. जल जीवन अभियानामुळे ९० टक्क्यांहून अधिक कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध झाली आहे.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील ४०,२४७ गावांपैकी ३४,५८४ गावे ओडीएफ+ घोषित करण्यात आली आहेत. नागरी भागात डिसेंबर २०२५ पर्यंत ४२ शहरे ओडीएफ, ८२ शहरे ओडीएफ+, २५७ शहरे ओडीएफ++ आणि ३० शहरे वॉटर+ घोषित झाली आहेत.

कृषी क्षेत्रातील स्थिती

२०२५ च्या मान्सूनमध्ये राज्यात सरासरीपेक्षा १०९.१ टक्के पाऊस पडला. खरीप हंगामात १५७.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली. तृणधान्ये, ऊस आणि कापूस उत्पादनात वाढ अपेक्षित असली तरी कडधान्ये आणि तेलबिया उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ११६.४० लाख शेतकऱ्यांना ९४.८२ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९,०२२.३८ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. सौर कृषी पंप योजनेंतर्गत डिसेंबर २०२५ अखेर ७.३७ लाख सौर पंप बसविण्यात आले आहेत.

उद्योग आणि गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर

'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५' अंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यात आली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत ६३.८५ लाख सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची नोंदणी झाली असून त्यातून २.५२ कोटींहून अधिक रोजगार निर्माण झाले आहेत.

देशातील थेट परकीय गुंतवणुकीत ३१ टक्के वाट्यासह महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. तसेच स्टार्टअप्सच्या संख्येतही राज्याचा देशात सर्वाधिक १७ टक्के हिस्सा आहे.

ऊर्जा व पायाभूत सुविधांमध्ये वाढ- ३१ मार्च २०२५ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ४१,०१९ मेगावॅट होती. नवीकरणीय ऊर्जेच्या उत्पादनात वाढ होत असून या क्षेत्रात महाराष्ट्र देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

मार्च २०२५ अखेर राज्यातील रस्त्यांची एकूण लांबी ३.४५ लाख किलोमीटर झाली आहे. १ जानेवारी २०२६ रोजी राज्यात ५२८ लाख वाहने नोंदणीकृत होती.

मुंबई-नागपूर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग जून २०२५ पासून पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला झाला आहे. तसेच मुंबई मेट्रो लाईन-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) ऑक्टोबर २०२५ पासून पूर्णपणे सुरू झाली असून दररोज सरासरी ७८ हजारांहून अधिक प्रवासी या मार्गाचा वापर करत आहेत.

पर्यटन आणि कनेक्टिव्हिटीमध्ये वाढ- भारत पर्यटन डेटा कंपेंडियमच्या माहितीनुसार २०२४ मध्ये परदेशी पर्यटक भेटींमध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. तसेच डिसेंबर २०२५ पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानसेवा सुरू झाली आहे.

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर, मंत्री नितेश राणे यांची माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर करण्यात आला आहे. मंत्री नितेश राणे यांनी आज विधान भवनाच्या आवारात माध्यमांना प्रतिक्रिया देताना याबाबत माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर करण्यात आला. गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात धर्मांतर विरोधी कायदा लागू होणार असल्याची चर्चा होती. मंत्री नितेश राणे यांच्याकडून वारंवार याबाबत भाष्य केलं जात होतं. अखेर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. अधिवेशनात याबाबतचा कायदा आगामी काळात पारित केला जाण्याची शक्यता आहे.

विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने आम्ही सगळ्यांनी ठणकावून सांगितलं होतं की, महाराष्ट्रात सक्षम असा धर्मांतर विरोधी कायदा म्हणजे लव्ह जिहाद विरोधी कायदा हा आमचा हिंदुत्ववादी विचाराचे सरकार घेऊन येईल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हा दिला होता. महाराष्ट्राच्या हिंदू समाजाने विश्वास ठेवून आपल्या हक्काचं हिंदुत्ववादी विचारांचं सरकार महाराष्ट्रामध्ये निवडलं. आज मला मनापासून समाधान वाटतंय की, आज महाराष्ट्रात एक सक्षम धर्मांतर विरोधी कायदा हा कॅबिनेटमध्ये पास झाला आहे, असं मंत्री नितेश राणे म्हणाले.

धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ या अंतर्गत येत्या लवकरच जीआर निघेल. यापुढे आमच्या कुठलीही हिंदू बहिणीकडे कुठलाही हिरवा साप, जिहादी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही. अशा पद्धतीने त्याने कुठलाही लव्ह जिहाद करण्याचा प्रयत्न केला तर आता महाराष्ट्रामध्ये अतिशय सक्षम धर्म स्वतंत्र अधिनय २०२६ असा कायदा लागू झाला आहे. यासाठी मी आमचे हिंदूत्ववादी विचारसराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि पूर्ण कॅबिनेटचे मनापासून आभार मानतो, अशी प्रतिक्रिया मंत्री नितेश राणे यांनी दिली.

दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबईच्या धारावीत आगीमुळे बाधित झालेल्या ४३६ झोपडपट्टी धारकांसाठी देखील महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व झोपडपट्टी धारकांसाठी देवनार येथे जागा देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे या झोपडपट्टी धारकांना दिलासा मिळणार आहे.

# महाराष्ट्राने दिलेलं प्रेम, विश्वास आणि पाठबळ हेच आयुष्याच्या ऊर्जेचे खरे स्त्रोत, शरद पवारांनी मित्रपक्षांचे मानले आभार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात राज्यसभेच्या ७ जागांसाठी निवडणूक होत आहे. ही निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भाजपकडून ४, शिवसेना शिंदे गटाकडून एक, राष्टवादी अजित पवार गटाकडून एक आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून एक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. राज्यसभेच्या एका जागेवर महाविकास आघाडीकडून शरद पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. यानंतर शरद पवार यांनी सोशल मीडियावर त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा पुढील सहा वर्षे सेवा करण्याची संधी देऊन माझ्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेचा तसेच माझ्या सर्व मित्रपक्षांचा मनापासून ऋणी असल्याचे शरद पवार म्हणाले.

१९६७ पासून माझा लोकप्रतिनिधी म्हणून प्रवास सुरू झाला आणि आजपर्यंत तो अखंडपणे सुरू आहे. हा प्रदीर्घ प्रवास केवळ माझा नसून महाराष्ट्राच्या जनतेचा आहे, कारण त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा संसदीय प्रवास कधीही खंड न पडता पुढे सुरू ठेवणे मला शक्य झाले.

विश्वास हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ

१९६७ मध्ये प्रथम महाराष्ट्रात विधानसभेवर निवडून जाण्याची संधी मिळाली. सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात सातत्याने काम करत असताना लोकांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर राज्यात मंत्री, मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली. तसेच केंद्रात संरक्षणमंत्री आणि दहा वर्षे कृषीमंत्री म्हणून काम करण्याची जबाबदारीही मला मिळाली. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना महाराष्ट्रासाठी तसेच देशासाठी सकारात्मक काम करता आले, यामागे जनतेचा विश्वास हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ राहिले आहे.


महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा पुढील सहा वर्षे सेवा करण्याची संधी देऊन माझ्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेचा तसेच माझ्या सर्व मित्रपक्षांचा मनापासून ऋणी आहे. महाराष्ट्राने मला दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठबळ हेच माझ्या आयुष्याच्या ऊर्जेचे खरे स्रोत आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी काम करण्याची संधी आयुष्यभर मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. पुढील काळातही जनतेच्या अपेक्षांना न्याय देत ही सेवा प्रामाणिकपणे करत राहण्याचा माझा प्रयत्न असेल.

सध्या डॉक्टरांनी मला विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे, त्यामुळे प्रत्यक्ष भेटून संवाद साधणे शक्य नसल्याने या पत्रकाच्या माध्यमातून मी आपल्यापर्यंत माझ्या भावना पोहोचवत आहे. महाराष्ट्राच्या जनतेचे प्रेम, पाठिंबा आणि विश्वास हेच माझ्यासाठी कायम प्रेरणादायी राहतील.

## रशियन तेल टँकर्स भारताच्या दिशेने रवाना

# मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा! ऐन युद्धात दिलासा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मॉस्को: मध्य पूर्वेत इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यात युद्ध पेटलं आहे. युद्धाचा सहावा दिवस आहे. यामुळे जगासमोर तेल संकट निर्माण झालं आहे. इराणनं आखाती देशांवर हल्ले चढवले आहेत. त्यामुळे खनिज तेलाचं उत्पादन घटलं आहे. दुसऱ्या बाजूला इराणनं होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक रोखली आहे. त्यामुळे तेलाचे दर आभाळाला भिडले आहेत. याचे पडसाद जगभरात उमटले आहेत.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारताला होणाऱ्या एकूण तेल पुरवठ्याच्या २० टक्के तेलाचा पुरवठा होतो. पण मध्य पूर्वेत युद्ध सुरु झाल्यापासून इराणनं सामुद्रधुनीतून होणारी वाहतूकच रोखली आहे. तेलाचे टँकर्स उडवण्याची धमकी दिली आहे. अशा स्थितीत भारतीय समुद्रात फिरणाऱ्या रशियाच्या तेलवाहू जहाजांनी भारताचे किनारे गाठले आहेत. जहाजांच्या ट्रॅकिंगशी संबंधित आकडेवारीतून ही बाब स्पष्ट झाली आहे. दोन रशियन तेलवाहू जहाजं पूर्व आशियाकडे निघाली होती. आता त्यांनी दिशा बदलली आहे. दोन्ही जहाजं भारताकडे येत आहेत. मध्य पूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे भारतानं रशियाकडून होणारी खनिज तेलाची खरेदी वाढवल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत.

तेल टँकर्सवर नजर ठेवणाऱ्या घश्रिशी आणि तेंींशुर च्या आकडेवारीनुसार, रशियन खनिज तेल ाचे २ टँकर्स या आठवड्यात भारतीय बंदरांवर तेलाचा साठा उतरवतील. या टँकर्समध्ये १४ लाख बॅरेल खनिज तेल आहे. ही जहाजं आधी पूर्व आशियाच्या दिशेनं निघाली होती. रशियन जहाजं बाल्टिक आणि काळ्या समुद्रातून तेल घेऊन निघतात. अमेरिकेनं रशियन तेल खरेदीवरुन निर्बंध लादण्याआधी भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात खनिज तेल खरेदी करत होता. अमेरिकेच्या निर्बंधांनंतर तेल खरेदी मोठ्या प्रमाणात घटली.

ब्लूमबर्गच्या एका वृत्तानुसार, ७,३०,००० बॅरल तेल वाहून नेणारा सूएजमॅक्स टँकर बुधवारी ओडिशाचं पारादीप बंदर गाठलं. तिथे या टँकरनं तेल साठा रिकामा केला का, याबद्दल अद्याप स्पष्टता नाही. तर ७,००,००० पेक्षा अधिक बॅरल तेल वाहून नेणारा अफ्रामॅक्स टँकर 'मतारी' गुरुवारी वडिनार बंदरात पोहोचणार आहे.

# अखेर भारताकडून खामेनींच्या मृत्यूवर शोकसंदेश जारी, इराणच्या दूतावासात जाऊन हस्ताक्षर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : इराणचे सर्वोच्च नेते अय्यातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारताने त्याचा निषेध केला नाही किंवा त्यावर कोणतंही भाष्य केलं नाही, त्यावरून अनेकदा प्रश्न उपस्थित केले जात होते. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी भारताच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली होती. त्यानंतर आता भारताने अधिकृतरित्या खामेनींच्या मृत्यूवर शोकसंदेश जारी केला. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात जाऊन शोकपुस्तिकेवर स्वाक्षरी केली आणि इराणचे मृत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली.

इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्लयामध्ये सर्वोच्च नेते अय्यातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यावर जगभरातून प्रतिक्रिया आली. असं असतानाही भारताने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती, किंवा भाष्य करणं टाळलं. त्याचवेळी इराणने सौदी अरबमधील अमेरिकन तळावर हल्ला केल्यानंतर मात्र भारताने त्याचा निषेध केल्याचं दिसून आलं.

नरेंद्र मोदी सरकारच्या या धोरणावर काँग्रेससह विरोधी पक्षांनी टीका केली. कोणतेही युद्ध घोषित न करता अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ला केला आणि त्यामध्ये खामेनींचा मृत्यू झाला. इराण आपला जुना मित्र असतानाही खामेनी यांच्या मृत्यूवर भारताने साधा शोकसंदेश जारी केला नाही, भारताची ही भूमिका निंदाजनक असल्याचं सोनिया गांधी यांनी त्यांच्या पत्रातून म्हटलं होतं.

आता मात्र भारताने उशीरा का होईना खामेनी यांच्या मृत्यूवर शोकसंदेश दिला. देशाचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात जाऊन शोकसंदेशावर हस्ताक्षर केले.

इराणच्या खामेनींच्या मृत्यूनंतर त्यावर पाकिस्तानच्या संसदेत श्रद्धांजली वाहण्यात आली. त्याचवेळी चीन आणि रशियाकडूनही या हल्लयाचा निषेध व्यक्त करण्यात आला आणि अमेरिका-इस्त्रायलच्या भूमिकेवर टीका करण्यात आली होती. दरम्यान, कोणताही मुद्दा हा लष्करी कारवाईच्या माध्यमातून सुटत नाही, दोन्ही बाजूंनी चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न सोडवावा अशी भूमिका भारताने मांडली आहे. या युद्धादरम्यान पश्चिम आशियामध्ये अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचंही भारताने जाहीर केलं आहे.

## संपादकीय....

### आर्थिक स्पर्धेत राज्य अग्रेसर

राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून चालू आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६' अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमध्ये वाढलेली गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार, २०२५-२६ मध्ये राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ५१,००,५९७ कोटी रुपये अपेक्षित आहे, तर वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी रुपये इतके राहण्याचा अंदाज आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपये अपेक्षित असून ते अखिल भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या (२,१९,५७५ रुपये) तुलनेत लक्षणीय जास्त आहे. पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०२४-२५ मध्ये देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे. सन २०२४-२५ मध्ये विविध क्षेत्रांत वाढ अपेक्षित आहे. कृषी व संलग्न क्षेत्रात ३.४ टक्के वाढ अपेक्षित आहे, तर उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि सेवा क्षेत्रात ९.० टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. सेवा क्षेत्रातील वेगवान वाढ राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देत असल्याचे अहव-ालात नमूद करण्यात आले आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील सरासरी ग्राहक किंमत निर्दे शांक ४०१.८ तर नागरी भागातील ३७६.७ इतका होता. या काळात ग्रामीण भागात २.० टक्के आणि नागरी भागात १.५ टक्के चलनवाढ नोंदविण्यात आली. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दरातील सुधारणांमुळे किमतींवर सकारात्मक परिणाम झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागरी भागात ८.७५ लाख तर ग्रामीण भागात १६.०४ लाख घरे पूर्ण झाली आहेत. जल जीवन अभियानामुळे ९० टक्क्यांहून अधिक कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध झाली आहे. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील ४०,२४७ गावांपैकी ३४,५८४ गावे ओडीएफ+ घोषित करण्यात आली आहेत.

# वंचितांच्या हक्कासाठी झटणारे निर्भीड व्यक्तिमत्त्व : वसंतराव वाघमारे यांची प्रेरणादायी वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : नुकतच दि.२ मार्च २२६ रोजी वागदरी ता. तुळजापूर जिल्हा धाराशिव येथील मूळ रहिवासी असलेले व सध्या हडपसर पुणे येथे वास्तव्यास असलेले सामाजिक जाणिवेचे कार्यकर्ते तथा पत्रकार वसंत रघुनाथ वाघमारे यांचा वाढदिवस संपन्न झाला त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने पुणे येथील सहारा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा मराठी साहित्याचे संशोधक व संविधान अभ्यास प्राध्यापक डॉक्टर बाळासाहेब सोनवणे यांनी त्यांच्या कार्याबद्दल घेतलेला थोडक्यात आढावा वाचकांसाठी जसास तसे प्रकाशित करीत आहोत.

षसमाजात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे कार्य, त्यांची जिद्द आणि त्यांची निष्ठा ही केवळ त्यांच्या वैयक्तिक यशापुरती मर्यादित राहत नाही; ती संपूर्ण समाजासाठी दिशादर्शक ठरते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे सन्माननीय वसंतराव वाघमारे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेताना, त्यांच्या जीवनप्रवास-ातील विविध पैलू समाजासमोर मांडणे हे आपले कर्तव्य आहे.

वसंत वाघमारे हे संविधान सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रात परिचित आहेत. सन्माननीय नेते रामदासजी आठवले साहेब यांचे ते समर्थक म्हणून ओळखले जातात; मात्र त्यांचा पाठिंबा हा व्यक्तिपूजेसाठी नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांसाठी आहे. Mahatma Phule, Shahu Maharaj आणि B. R. Ambedkar यांच्या समतावादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या कार्यात प्रकर्षाने जाणवतो.

**सामाजिक कार्याचा विस्तृत पट**

वसंतराव वाघमारे यांनी वंचित, पीडित आणि दुर्लक्षित घटकांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. सामाजिक न्याय, शैक्षणिक हक्क, आरक्षण विषयक जनजागृती आणि शासकीय योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविणे-या सर्व क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबवले गेले. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, करिअर मार्गदर्शन शिबिरे, संविधान जनजागृती कार्यक्रम आणि सामाजिक समता मेळा-वे-या माध्यमांतून त्यांनी संविधानातील मूल्यांचा प्रसार केला.

**पत्रकारितेतील निर्भीड भूमिका**

पुण्यनगरीतील आदर्श पत्रकार म्हणून वसंतराव वाघमारे यांचे नाव आदराने घेतले जाते. पत्रकारिता ही सम ाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या जाणिवेतून त्यांनी लेखणी चालवली.

भ्रष्टाचार, सामाजिक विषम ता, शैक्षणिक अडचणी, महिला व बालकांवरील अन्याय अशा विविध विषयांवर त्यांनी निर्भीडपणे भूमिका मांडली. त्यांची पत्रकारिता सनसनाटीपणावर आधारित नसून सत्य, तत्त्वनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकीवर आधारित आहे.

**फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा प्रभाव**

Mahatma Phule, Shahu Maharaj आणि B. R. Ambedkar यांच्या समतावादी, मानवतावादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव त्यांच्या विचारांत आणि कृतीत दिसून येतो.

सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि संविधाननिष्ठा-या म ूल्यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला आहे. ते केवळ विचार मांडत नाहीत, तर कृतीतून त्यांची अंमलबजावणी करतात.

**व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्यपूर्ण गुण**

वसंतराव वाघमारे हे कष्टाळू, प्रामाणिक आणि निस्वार्थी व्यक्तिमत्त्व आहे. सामाजिक कार्य करताना त्यांनी वैयक्तिक लाभाचा कधीही विचार केला नाही.

त्यांची जीवनशैली साधी असली तरी विचारांची उंची विलक्षण आहे. कोणत्याही अडचणीसमोर शांतपणे आणि संयमाने उभे राहण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी आहे.

त्यांच्या कार्यात शिस्त, सातत्य आणि पारदर्शकता दिसून येते. त्याम ुळेच समाजातील विविध स्तरांतील लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात.

**सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जाणीवा**

महापुरुषांच्या जयंती व परिनिर्वाण दिनांचे आयोजन, इतिहास जनजागृती व्याख्याने आणि सांस्कृतिक स्पर्धा-या उपक्रमांतून त्यांनी नव्या पिढीला सामाजिक आणि ऐतिहासिक जाणीवा दिल्या.

**महिला व बालकल्याणासाठी योगदान**

महिला सक्षमीकरण आणि बालकल्याण ही त्यांच्या कार्याची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महिलांसाठी मार्गदर्शन शिबिरे, कायदेविषयक जनजागृती, आरोग्य तप-ासणी शिबिरे आणि बालकांच्या शिक्षणासाठी मदत-या माध्यमांतून त्यांनी समाजातील दुर्बल घटकांना आधार दिला.



**पर्यावरण व आरोग्य उपक्रम**

वृक्षारोपण मोहिमा, स्वच्छता अभियान आणि प्लास्टिकविरोधी जनजागृती या उपक्रम ांतून त्यांनी पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली.

रक्तदान शिबिरे, आरोग्य तप-ासणी शिबिरे आणि आरोग्यविषयक म ार्गदर्शन कार्यक्रम हेही त्यांच्या कार्याचा अविभाज्य भाग आहेत.

**समाजासाठी प्रेरणादायी संदेश**

वसंतराव वाघमारे यांची वाटचाल ही संघर्ष, समर्पण आणि समाजनिष्ठेची आहे. त्यांनी सिद्ध केले की दृढ निश्चय, प्रामाणिकपणा आणि सातत्य यांच्या जोरावर परिवर्तन घडविता येते.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करताना, त्यांच्या कार्याला दीर्घायुष्य लाभो आणि सम ाजसेवेची त्यांची ज्योत अशीच प्रखर-तेने प्रज्वलित राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

वसंतराव वाघमारे यांचे जीवन हे सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने समाजासाठी योगद-ान देणे, हीच त्यांच्या वाढदिवसाची खरी भेट ठरेल..

**- प्रा. (डॉ). बाळासाहेब सोनवणे**
**संस्थापक अध्यक्ष**
**- सहारा फाउंडेशन**
**मराठी साहित्याचे संशोधक व संविधान अभ्यासक**

# शिवरायांच्या स्मारकांना मिळणार प्रशासकीय कवच; महेश डोंगरे पाटील यांचे राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांकडे निवेदन सादर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : १९ फेब्रुवारी २०२६ रोजी साजरी झालेली शिवजयंती यंदा एका वेगळ्या 'वैचारिक क्रांती'साठी ओळखली गेली. महाराष्ट्रातील अनेक गावांत डीजे आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत, लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराजांची शेकडो स्मारके उभारण्यात आली. मात्र, या स्मारकांच्या नियमितीकरणाचा आणि शिवप्रेम ींवर होणाऱ्या कारवाईचा प्रश्न गंभीर होता. याच पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक श्री. महेश डोंगरे पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि शिवप्रेमींच्या भावनांना न्याय मिळवून देण्यासाठी ठोस पाऊल उचलले.महेश डोंगरे पाटील हे केवळ समन्वयक नसून समाजाच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर असण-ारे व्यक्तिमत्व आहे. बुलढाणा येथे शिवस्मारकाच्या संरक्षणासाठी मराठा भगिनींवर झालेला अन्याय असो वा सोलापूरसह इतर जिल्ह्यांतील अशा संवेदनशील घटना, महेश डोंगरे पाटील यांनी नेहमीच घटनास्थळी धाव घेऊन प्रशासनाला जाब विच-ारला आहे. ही स्मारके केवळ दगड-मातीची नसून येणाऱ्या पिढीला संस्कार देणारी केंद्रे आहेत, ही त्यांची भूमिका समाजात महत्त्वाची ठरली आहे. याच संवेदनशीलतेतून त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी केली की, लोकसहभागातून उभारलेल्या या स्मारकांना अधिकृत मान्यता मि ळावी आणि कोणत्याही शिवप्रेमीवर प्रशासकीय गुन्हे दाखल होऊ नयेत.



या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवप्रेम ींच्या बाजूने सकारात्मक कौल दिला आहे. त्यांनी तातडीने म हसूल सचिव आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांना या प्रकरणाचा सखोल अह-वाल सादर करण्याचे निर्दे श दिले आहेत. या स्म ारकांच्या नियमितीकरणासाठी सुवर्णमध्य काढण्याचे आश्वासन देतानाच, प्रशास-नाने कोणत्याही शिवप्रेमीला नाहक त्रास देऊ नये, अशा स्पष्ट सूचनाही शिंदे साहेबांनी दिल्या आहेत.

स्वतः उपमुख्यमंत्री शिंदे साहेब हे शिवरायांच्या विचारांचे पाईक असल्याने, या स्मारकांना लवकरच सरकारी बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. महेश डोंगरे पाटील यांच्या या यशस्वी शिष्टाईमुळे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आता महाराजांची स्म ारके डौलाने उभी राहतील. या माध्यम ातून शिवरायांचा देदीप्यमान इतिहास आणि वैचारिक वारसा पुढच्या अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

# पंढरपुरातील जड वाहतूक बंद करा; अन्यथा तीव्र आंदोलन करणार, भाजप शहराध्यक्ष विक्रम शिरसाट यांचा इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : पंढरपूर शहरांमधून सुरू असलेली जड वाह-तूक त्वरित बंद करून ती बायपास किंवा रिंग रोड रस्त्यावरून करावे अन्यथा माझ्याकडून लोकशाही म ार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशारा भाजपचे शहराध्यक्ष दत्ता माजी नगरसेवक विक्रम शिरसाठ यांनी दिला व शहरातून होणारी जड वाहतूक बंद करावी व या संदर्भात त्यांनी शहर पोलिसांना नुकतेच एक निवेदन दिले आहे.

दरम्यान शहराध्यक्ष शिरसाट यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात नमूद केलेले आहे पंढरपूर शहरांम ध्ये वाढते यात्रेकरू व वारकरी वाढती लोकसंख्या पाहता वाहतूक व्यवस्थेची फार अडचण होत आहे त्यामुळे शहरात दिवसेंदिवस अपघ-ाताची संख्या वाढल्याने नुकतेच एक शाळकरी मुलीचा टिप्परच्या दडकेम ध्ये मृत्यू झाला आहे त्यामुळे पंढरपूर शहरांमध्ये येणाऱ्या प्रमुख रस्त्यावरून होणारी जड वाहतूक बंद करून ही शहराबाहेरील रिंग रोड किंवा बायपास रस्त्याने सुरू करावी यासाठी होणारी वाहतुकी कारवाई करावी होणारी अपघात टाळता येतील. जर आपणाकडून या मागणी-चे दखल घेतली गेली नाही तर आम्हाला लोकशाही मार्गाने या मागणीसाठी आंदोलन करावे ला-गेल असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे त्यामुळे येत्या काळात शहर पोलिसांकडून शहरातील प्रमुख रस्त्यावरील होणाऱ्या जड वाहतुकीवरून कोणता निर्णय घेतला जातो याबाबतची उत्सुकता आता शेअर वाचनाला लागून राहिलेले यावेळी नगरसेवक सौरभ थिटे पाटील देखील उपस्थित होते.

## प्रभाकर सोनवणे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/प्रतिनिधी : अपसिंगा तालुका तुळजापूर येथील फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते प्रभाकर किसन सोनवने यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी दि.४ म ार्च २०२६ रोजी पहाटे ठिक ४. वा.दरम्यान अल्पशा अजराने दुःखद निधन झाले.

दिवंगत प्रभाकर सोनवने हे एक अत्यंत प्रामाणिक व कष्ठाळू व्यक्तीमत्व होते. ते सहकार्याच्या भावनेतून प्रत्येकांच्या सुख दुःखात सहभागी होत असत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असो किंवा कोणताही सार्वजनिक कार्यक्रम असो प्रत्येक कार्यक्रमात ते अवर्जून सहभागी व्हायचे.

त्यांच्या पश्चात पत्नी, तिन मुलं, एक मुलगी सुना जावाई नातवंडे असा मोठा परिवार आहे.अपसिंगा येथेच बौद्ध धम्म संस्कारानुसार त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम संस्कार करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित शोकाकूल जन समुदायानी त्याना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली.

# मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य यांचा शिक्षक संघाच्या वतीने सत्कार संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

मंगळा तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा सोसायटी शाखा मंगळवेढा येथे मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

सदर कार्यक्रमात नुकताच झालेला जि.प.व पं.स. सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेली जिल्हा परिषद भोसगटाचे मा.प्रदीप खांडेकर, हुलजंती गटातून मासव संगीता हनुमंत शेठ दुधाळ, दामाजी नगर गटातून मा रमेश भांजे, लक्ष्मी दहिवडी गटातून मा सौ करुणाताई शिवशरण, लक्ष्मी दहिवडी गणातून मा विनायक यादव, चोखामेळा नगर गणातून मा सौ दिप-ाली आनंदराव ताड, बोराळी गणातून सौ जयश्री संजीव कवचाळे, मोरवाडी गणातून सौ मोहिनी श्रीकांत गण पाटील, हुलजंती मानातून मल्लिकार्जुन मल्लाळी व भोसे गणाचे डॉक्टर आबासाहेब निकम यांचा तसेच मिस्टर सदस्य जनार्दन शिवशरण, आनंदराव लाड श्रीकांत गण पाटील, संजीव कवचाळे यांचाही शिक्षक संघाची कार्यकारिणी मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच बहुमताने निवडून आल्यानंतर अभिनंदन करून जनतेची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी महाराष्ट्र शिक्षक पॅनल चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सुखदेव डांगे गुरुजी आणि शिवानंद कोळी गुरुजी यांचा नूतन सदस्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच लक्ष्मी दहिवडी पंचायत समितीचे धन्यवाद चे सदस्य विनायक यादव यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून सत्कार करण्यात आला.

सदर सत्कार सोहळ्यात शिक्षक संघाची तालुकाध्यक्ष कथा जिल्हा सतीश संभाजी तानावडे जिल्हा उपाध्यक्ष विष्णू आजबे सोल-ापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक संजय केळेकर व गुंडा भाऊ घाडगे यांनी आपल्या मनोगता-तून नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांचे आणि अभिनंदन करून जिल्हा परिषद शाळेचे गुणवत्ता वाढण्यासाठी शाळा टिकवण्यासाठी व शिक्षकांच्या विविध प्रशासंदर्भात सहकार्य करण्याबाबत आव्हान केले सत्काराचे उत्तर येताना जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, व जिल्हा परिषद सदस्य करुणाताई शिवशरण पंचायत समिती सदस्य दिपाली ताड, पंचायत समिती सदस्य विनायक यादव यांनी सत्कार व आयोजित केल्याबद्दल सर्वांचे वतीने धन्यवाद देऊन शाळा व शिक्षकांच्या विविध प्रश्नसंदर्भात सहकार्य करण्याची अभिवचन दिले, सदर कार्यक्रमास मंगळवेढा तालुका शिक्षक संघाचे सरचिटणीस राजेंद्र केदार, कार्याध्यक्ष नागेश कुंभार धनवे, कोषाध्यक्ष सखाराम सावंत, व कार्यकारणी मंडळ, श्री संत दामाजी प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळ, आदर्श शिक्षक समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर सावंत, एकल शिक्षक मंचाचे तालुकाध्यक्ष आप्पाराया नागमोडी असे शिक्षक मित्र मंडळ उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# म्हैसाळ योजनेतील मंगळवेढ्यातील लाभ क्षेत्रातील गावांना स्वतंत्र बंदिस्त नलिकेद्वारे पाणी देण्यासाठी सर्व्हे करा

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचना; मुंबई येथील बैठकीत महत्त्वांच्या विषयावर बैठका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/तालुका प्रतिनिधी : म्हैसाळ योजनेतील मंगळवेढा तालुक्यातील लाभ क्षेत्रातील सर्व गावाना उच्च दाबाने पाणी मिळण्यासाठी म्हैसाळच्या मुख्य कॅनाल वरून स्वतंत्र बंदिस्त पाईप द्वारे पाणी देणे तसेच शिरसी, मानेवाडी, भोसे गावातील दक्षिण पश्चिम बाजूच्या भागाला स्वतंत्र पाईपद्वारे पाणी देण्यासाठी सर्व्हे करावा, शिरनांदगी, पडोळकरवाडी, मारोळी व लवंगी हे साठवण तलाव मुख्य कॅनालवरुन थेट बंदीस्त नलिकेद्वारे भरून देण्याच्या कामाचे सुधारीत संकल्पन करून तातडीने सर्व्हे करून प्रस्ताव देण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत.



मंगळवेढा तालुक्यातील म्हैसाळ योजनेतील पाणी मिळत असलेल्या गावांना मिळणाऱ्या पाण्याबाबत च्या अडचणी सोडवण्यासाठी व नवीन तीन गावांना पाणी देण्याच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुंबई येथे बुधवार दिनाक ४ मार्च रोजी ५ वाजता मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीस आमदार समाधान आवताडे यांनी उपस्थित राहून मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भागातील १९ गावांना म्हैसाळचे पाणी मिळत आहे परंतु हे पाणी अपुऱ्या व कमी दाबाने मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना याचा उपयोग होत नाही व अपुऱ्या दाबामुळे मिळणाऱ्या पाण्यामुळे शेतकऱ्यांमध्ये वाद विवाद होत असल्याने वितरिका क्रं १, वितरिका क्रं २, उमदी डी. वाय. वरून ८ गावांना पाणी दिले जाते त्याऐवजी मुख्य कालव्यावरून मंगळवेढा तालुक्यासाठी स्वतंत्र बंदिस्त पाईप टाकून द्यावे तसेच शिरशी मानेवाडी भोसे या गावाचा कोणत्याही पाणी योजनेत समावेश नसल्यामुळे या गावांना म्हैसाळ योजनेतून पाणी द्यावे तसेच पडोळकरवाडी, शिरनांदगी, मारोळी, लवंगी या साठवण तलावात बंदिस्त पाईपलाईन द्वारे पाणी सोडण्याची मागणी आ.आवताडे यांनी केली होती त्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत उमदी वितरीकेद्वारे सिंचन होत असलेल्या मंगळवेढा तालुक्यातील ८ गावांसाठी जत शाखा मुख्य कालवा येथून थेट स्वतंत्र बंदीस्त पाईप टाकुन देणे तसेच जत येथील मुख्य मुख्य कालव्यातून स्वतंत्र बंदिस्त पाईप टाकणे, म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत मंगळवेढा तालुक्यातील शिरसी, मानेवाडी, भोसे गावातील दक्षिण-पश्चिम बाजुच्या भागाला स्वतंत्र पाईपद्वारे पाणी देणेबाबत तात्काळ सर्वेक्षण करून तातडीने प्रस्ताव द्यावा म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत मंगळवेढा तालुक्यातील लाभक्षेत्रात असलेले शिरनांदगी, पडोळकरवाडी, मारोळी व लवंगी हे साठवण तलाव उप वितरिका व लहान पाईप द्वारे भरून देत असल्याने ते साठवण तलाव भरत नसल्याने ते त्वरित भरण्यासाठी मुख्य कॅनालवरुन थेट बंदीस्त नलिकेद्वारे भरून देण्याच्या कामाचे सुधारीत संकल्पन तयार करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच मंगळवेढा तालुक्यासाठी १.२७ टी एम सी पाणी राखीव असताना तालुक्याला केवळ .२७ टी एम सी इतके पाणी मिळत असल्याने तालुक्यावर अन्याय होत असल्याचे आ आवताडे यांनी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या निदर्शनास आणताच विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मंगळवेढा तालुक्याचे हक्काचे सर्व पाणी त्यांना मिळाले पाहिजे त्यादृष्टीने सर्वे करून प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी आमदार समाधान आवताडे डॉ.संजय बेलसरे सचिव (ला.क्षे.वि), डॉ.एच.टी.धुमाळ कार्यकारी संचालक. संजीव चोपडे, मुख्य अभियंता(वि.प्र) काटपल्लीवार सहसचिव रोशन हटवार उपसचिव चंद्रशेखर पाटोळे अधीक्षक अभियंता. का.ला.मासाळ कार्यकारी अभियंता, स्व.अ.गोसावी सहाय्यक कार्यकारी अभियंता, जि. प. सदस्य प्रदीप खांडेकर, स्वीय सहाय्यक रावसाहेब फटे आदी उपस्थित होते.

## पुरंदरमध्ये ७ मार्च पासून 'महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिर सुरु : तहसीलदार विक्रम राजपूत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : प्रशासकीय इमारत सासवड या ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासन लोकांच्या दारी या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी पुरंदर तालुक्यात 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहेअशी माहिती तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिली.या बैठकीसाठी संदीप पाटील नायब तहसीलदार, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे, अजय इंगळे, डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, पंचायत समिती सदस्य अमित झेंडे, माऊली यादव, माणिक निंबाळकर, मोनिका कांबळे, सायली शिंदे, स्मिता निगडे, अर्चना कटके, सर्व मंडलं अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच,ग्राम सेवक, कृषिसाहायक,तहसीलदार कचेरी कर्मचारी या नियोजन बैठकीसाठी उपस्थित होते.हे शिबिर शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे वाघापूर येथील श्री भैरवनाथ मंदिर येथे संपन्न होणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय पुरंदर व तहसील कार्यालय पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरामुळे कुंभारवळण आणि राजेवाडी महसूल मंडळातील

कुंभारवळण आणि राजेवाडी परिसरातील सर्व शेतकरी बांधव,



भगिनी आणि तरुणांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रशासकीय कामे पूर्ण करून घ्यावीत. प्रशासनाचे अधिकारी स्वतः तुमच्या दारी येत असून, या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकरी व ग्रामस्थांना आपल्या विविध कामांसाठी सरकारी कचेऱ्यांचे उंबरठे झिजवण्यापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

एकाच छताखाली मिळणार 'या' महत्त्वपूर्ण सेवाः या शिबिरामध्ये विविध विभागांचे स्टॉल्स लावले जाणार असून, खालील सेवांचा लाभ नागरिकांना घेता येईल प्रलंबित फेरफार नोंदी, सातबारा उताऱ्यामधील नावांच्या चुकांची दुरुस्ती, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा

आणि ८-अ उताऱ्यांचे थेट वाटप. तसेच तुकडे बंदी नियमितीकरण आणि वर्ग-२ जमिनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल. दाखले व प्रमाणपत्रेः लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, उत्पन्न दाखला, रहिवास व अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्रांचे संकलन व वाटप केले जाईल. सामाजिक सुरक्षा योजनाः

संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी पेन्शन योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज निकाली काढले जातील.

डिजिटल नोंदणी (एक खिद्रव योजना): शेतीशी संबंधित अत्यंत महत्वाची ॲग्रिस्टेंग नोंदणी, पीएमा किसान नवीन नोंदणी आणि प्रलंबित ई-केवायसी ची कामे या शिबिरात पूर्ण केली जातील.

भूसंपादन आणि अकृषिक जमिनींच्या संदर्भातील 'कमी-जास पत्रक तयार करणे, तसेच अकृषिक तस्तुदीनुसार सुधारित अधिमूल्य वसूल करून प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाचा वेळ आणि पैसा दोन्ही ची ही बचत होणार आहे.

## नळदुर्ग येथे राज्य परिवहन महामंडळातील मान्यवर कर्मचाऱ्यांचा सत्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियाना अंतर्गत नळदुर्ग बस स्थानकाचा धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल राज्य परिवहन महामंडळाच्या मान्यवर कर्मचाऱ्यांचा नळदुर्ग ता.तुळजापूर येथे सत्कार करण्यात आला.

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने महाराष्ट्रभर राबविण्यात आलेल्या हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियाना अंतर्गत नळदुर्ग बस स्थानकाचा धाराशिव जिल्ह्यात स्वच्छेच्या बाबतीत प्रथम क्रमांक आल्या बद्दल संत गाडगेबाबा स्वयंसेवी संस्था देवसिंगा (तुळ ) ता. तुळजापूर च्या वतीने नळदुर्ग बसस्थानकात राज्य परिवहन महामंडळाचे कार्यरत असलेले कर्मचारी मान्यवर वाहतूक नियंत्रक महेश मनोहर डुकरे, दुसरे वाहतूक नियंत्रक अनिल महादेव हांडे, तात्पुरते वाहतूक नियंत्रक गुंडाप्पा माणिक डुकरे व स्वच्छता कर्मचारी अर्थात स्वच्छता दूत लहू पांडुरंग देडे यांचा फेटा पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. प्रारंभी लोकमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संत गाडगेबाबा स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तानाजी जाधव यांनी केले तर सूत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले व आभार प्रदर्शन शिवसेना नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले यांनी केले.

यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के, रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते अशफाक जमादार, युवा कार्यकर्ते स्वप्नील जाधव, आकाश हराळकर, कुणाल बेले, दानेश जमादार, खयुमअली जमादार, आयान जमादार सह प्रवासी ग्रामस्थ उपस्थित होते.



## सुफी सय्यद शमशोद्दीन समाजभुषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे, : साई धनवर्षा फाऊंडेशन च्या वतीने आयोजित समाजरत्नांचा सत्कार सोहळा प्रतिवर्षी आयोजित केला जातो.यात शैक्षणिक, समाजिक, आरोग्य, शेती, प्रशासन, सांप्रदायिक, पत्रकार, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना *समाज भुषण*पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यात महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.या मध्ये लातूर जिल्ह्यातील समाजसेवक सुफी सय्यद शमशोद्दीन चाँदसाहेब, भिसे वाघोलीकर यांनाही दंडवत आंदोलन, महिला परिचरांच्या न्याय व हक्कासाठी आंदोलन, दिन व गरजू लोकांच्या न्याय व हक्कासाठी अविरत लढा देत आहेत म्हणून समाजभुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजक नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते संजय विजय देशमुख हे होते. यावेळी ब्रम्हाकुमारी सरला बेन तसेच नाशिक येथील नामवंत उपस्थित होते.दिवसभर सुरु असलेल्या या सोहळ्यात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील समाजसेवक उपस्थित होते.

सुफी सय्यद शमशोद्दीन यांना यापुर्वीही दिल्ली येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतभुषण नॅशनल क्सलेंस वॉर्ड, पुणे येथे भारत गोरव पुरस्कार, मुंबई येथे कर्तव्यदक्ष आदर्श समाजसेवक पुरस्कार, चंद्रपूर भद्रावती येथे संविधान सन्मान राष्ट्रीय गौरव पुरस्कार, दिल्ली येथे सुभाषचंद्र बोस आयकॉन अवार्ड अशा प्रकारे पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले सुफी सय्यद शमशोद्दीन यांना समाजभुषण पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल सर्वत्र त्यांचा सत्कार व कौतुक करण्यात येत आहेत.

**पडघ्यातील १०० वर्षे जुनी ऐतिहासिक विहीर खुली करण्यास टाळाटाळ? सामाजिक कार्यकर्त्यांचा सवाल - इतिहास पुसण्याचा प्रयत्न तर नाही ना?**

# पडघ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाणी सत्याग्रहाची साक्ष देणारी 'सतीची विहीर' बुजली; प्रशासनाची दोन महिन्यांची शांतता नेमकी कशासाठी?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघे गावात ऐतिहासिक वारसा जपणारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाणी सत्याग्रहाची साक्ष देणारी सर्वे नं. ७९/१० मधील 'सतीची विहीर' बुजवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेनंतर दोन महिने उलटूनही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

सतीची विहीर पुन्हा खुली करून तिचे ऐतिहासिक स्वरूप जतन करावे, या मागणीसाठी पडघा व समतानगर येथील सामाजिक कार्यकर्ते मिलिंद जाधव यांनी मुंबई येथील पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, ठाणे जिल्हाधिकारी, भिवंडी प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्याकडे लेखी निवेदने दिली.

त्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल भिवंडी तहसील कार्यालयाकडे सादर केल्याची माहिती आहे. मात्र, दोन महिने लोटूनही तहसीलदार स्तरावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे हा मुद्दा केवळ कागदोपत्री राहणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पडघा ग्रामपंचायत हद्दीतील ही विहीर जवळपास १०० वर्षे जुनी असल्याचे सांगितले जाते. स्थानिकांच्या मते, याच सतीच्या

> **सतीची विहीर वाचवण्यासाठी गेली २० वर्षे आम्ही पाठपुरावा करत आहोत. ग्राम पंचायतीला वारंवार तक्रारी करूनही काहीच कारवाई होत नाही. विलंब का होतो, याचे उत्तर कोणी देत नाही.**
> **– ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद साने**

विहिरीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाणी सत्याग्रह केला होता. त्या वेळी ते समतानगर येथील काशिनाथ हाशाबा दोंदे यांच्या घरी उतरले होते. सत्याग्रहींसह विहिरीवरून पाणी काढून सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला होता. या ऐतिहासिक घटनेमुळे ही विहीर केवळ पाण्याचा स्रोत नसून सामाजिक न्यायाच्या लढ्याची जिवंत साक्ष मानली जाते.

समतानगर येथील दिवंगत हिराबाई दुंदांजी सोनावणे (वय ९६) यांनी जिवंत असताना सांगितलेल्या आठवणी आजही ग्रामस्थांच्या मनात ताज्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, बाबासाहेबांनी सतीच्या विहिरीवर सत्याग्रह केल्यानंतर शिसवीच्या झाडाखाली सभा घेतली होती आणि मुलांना शिक्षण द्या असा संदेश दिला होता. या आठवणींमुळे सतीची विहीर ही पडघ्याच्या इतिहासाचा अविभाज्य भाग ठरते.

ही ऐतिहासिक विहीर पुन्हा खुली होणार का? प्रशासनाकडून

> **डॉ. बाबासाहेबांनी पदस्पर्श केलेली ही विहीर आमच्या पडघ्याचा अभिमान आहे. त्यांच्या पाऊलखुणा पुसण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. शासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणार का, की अर्जांना केराची टोपली दाखवली जाणार? असे आम्ही होऊ देणार नाही.**
> **– सामाजिक कार्यकर्ते मिलिंद जाधव**

जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का? की प्रक्रिया सुरू असून नागरिकांना माहिती दिली जात नाही? सतीची विहीर हा केवळ स्थानिक वादाचा विषय नसून सामाजिक न्यायाच्या इतिहासाशी निगडित वारसा आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



पडघ्यातील सतीची विहीर पुन्हा उघडली जाणार की इतिहासाच्या पानांवरच कायमची बंद होणार – याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# सोलापूरच्या प्रा. ज्योती वाघमारे राज्यसभेच्या रिंगणात; शिवसेनेकडून उमेदवारी जाहीर



## राज्यसभा निवडणुकीत शिंदे गटाचा धक्कादायक निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरासाठी महत्त्वाची राजकीय घडामोड समोर आली आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून राज्यसभेसाठी सोलापूरच्या प्राध्यापिका प्रा. ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे सोलापूरच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बुधवारपर्यंत शिवसेनेकडून राज्यसभेसाठी खासदार राहुल शेवाळे आणि गजानन कीर्तिकर यांच्या नावांची जोरदार चर्चा होती. मात्र गुरुवारी पक्षाने अचानक प्रा. ज्योती वाघमारे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती समोर आली.

प्रा. वाघमारे यांच्या नावाची घोषणा होताच सोलापूरमधील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, शहराला राज्यसभेत प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री एज्ञपरींह डहळपवश यांनी त्यांच्या कामाची दखल घेत ही संधी दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

प्रा. वाघमारे यांनी मुख्यमंत्री असताना एज्ञपरींह डहळपवश यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांदरम्यान प्रचाराची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडली. तसेच शिवसेनेच्या मुख्य प्रवक्त्या म्हणून राज्यस्तरावर पक्षाची भूमिका ठामपणे मांडत त्यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली.

याच कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिल्याचे सांगितले जात आहे.

राज्यसभा निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) कडून मोठा राजकीय निर्णय घेण्यात आला आहे. माजी खासदार राहुल शेवाळे यांचे नाव चर्चेत असतानाही शेवटच्या क्षणी ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे महत्त्वाचे निर्णय घेतले आहे राज्यसभेच्या एका जागेसाठी पक्षाकडून ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देण्यात आले असून हा निर्णय राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

या जागेसाठी माजी खासदार राहुल शेवाळे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत होते मात्र शेवटच्या क्षणी पक्षाने वेगळा निर्णय घेत वाघमारे यांच्या यांच्यावर विश्वास दाखवला.

राहुल शेवाळे यांचे नाव चर्चेत होते पण शिवसेना चिंदेगड मध्ये राज्यसभेचा एकच जागेसाठी अनेक नेते इच्छुक होते त्यामध्ये राहुल शेवाळे, गजानन कीर्तिकर, आनंद अडसूळ आणि इतर काही नेत्यांची नावे चर्चेत होते.

राहुल शेवाळे एकनाथ शिंदे यांची जवळची सहकार्य मानले जातात शाखाप्रमुख ते खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला असून ते दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघातून खासदार होते.

# बार्टीच्या निबंधक पदाचा डॉ. सुचिता शिंदे यांनी स्वीकारला पदभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या निबंधक पदाचा पदभार छत्रपती संभाजीनगर भूसंपादन विभागातील उपजिल्हाधिकारी डॉ सुचिता वसंतराव शिंदे यांनी दिनांक ५ मार्च २०२६ रोजी स्वीकारला.

बार्टी, पुणे मुख्यालयातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस त्यांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेली डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्था राज्यातील एक महत्त्वपूर्ण संस्था आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी बार्टी संस्थेच्या निबंधकपदी प्रतिनियुक्तीने डॉ सुचिता वसंतराव शिंदे यांची नियुक्ती केली होती.

कार्यालय अध्यक्ष श्रीमती प्रज्ञा मोहिते , प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, शुभांगी सुतार यांच्या हस्ते डॉ शिंदे यांना पुष्पगुच्छ भेट देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, जिल्हा जात पडताळणी समितीचे विभागप्रमुख रविंद्र कदम, लेखाधिकारी नितिन चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, नितीन सहारे, महेश गवई यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ सुचिता शिंदे यांची बार्टी संस्थेत निबंधक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# मराडे पाडा येथे महाराष्ट्रातील पहिले भव्य दिव्य छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचा प्रथम वर्धापन दिन होणार दिमाखात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ हे महाराष्ट्रातील पहिले भव्य-दिव्य छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर म्हणून राज्यभर ओळखले जात असून, या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त दि. ५ व ६ मार्च रोजी अत्यंत भव्य, दिमाखदार आणि ऐतिहासिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवक्रांती प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य तसेच छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ, मराडे पाडा यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडणार आहे. ग्रामीण भागातील शिवभक्त मावळ्यांच्या अथक परिश्रम, निष्ठा आणि शिवप्रेमातून उभारण्यात आलेले हे मंदिर आज संपूर्ण महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक ठरत आहे. स्वराज्याचे संस्थापक, पराक्रम आणि आदर्श राज्यकारभाराचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिराची भव्य वास्तुरचना, आकर्षक शिल्पकला, प्रशस्त सभामंडप आणि दिव्य वातावरण यामुळे राज्यभर या मंदिराची चर्चा सुरू असून बिदेशातील शिवप्रेमींकडूनही या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिवक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या संकल्पना, नेतृत्व आणि दूरदृष्टीतून साकारलेल्या या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांची विस्तृत आखणी करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी वेदमंत्रांच्या गजरात महाअभिषेक, विशेष पूजन, हरिपाठ, कीर्तन व भजन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच शिवचरित्रावर आधारित प्रेरणादायी व्याख्यानमाला घेण्यात येणार आहे. दुसऱ्या दिवशी शिवजयंतीचे औचित्य साधून भव्य मिरवणूक, ढोल-ताशांच्या गजरात स्वागत सोहळा, युवकांसाठी प्रेरणादायी कार्यक्रम, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई, पारंपरिक सजावट, फुलांची आरास आणि भगव्या ध्वजांनी सजविण्यात येणार असून संपूर्ण परिसरात शिवमय वातावरण निर्माण होणार आहे. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा ऐतिहासिक ठरणार असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतून तसेच बाहेरगावाहूनही शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हा वर्धापन दिन सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, शिवसंस्कार दृढ करणारा, युवकांना राष्ट्रप्रेम व स्वाभिमानाची प्रेरणा देणारा आणि समाजात एकात्मतेचा संदेश देणारा उत्सव ठरणार आहे, असे आयोजकांनी नमूद केले आहे. या मंगल प्रसंगी सर्व शिवभक्त, ग्रामस्थ, नागरिक आणि इतिहासप्रेमींनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करावे व या अभूतपूर्व सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**५ व ६ मार्च रोजी ऐतिहासिक, आणि अभूतपूर्व रंगणार सोहळा**

# स्वामी विवेकानंद पुरस्कार सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेच्या माध्यमातून देण्यात येणारा स्वामी विवेकानंद पुरस्कार २०२६ हा मुंबई येथील उद्योगपती आणि वृक्षमंत्र अजित कंडरे यांना जगद्गुरु श्री.संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प शिवाजी मोरे महाराजांच्या हस्ते देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील उद्योजक सुरेश पाटील उपस्थित होते.

देव मंदिरात नसून चराचरात आहे, आणि तो निसर्गात आपल्याला प्रत्यक्ष दिसू शकतो.त्यामुळे वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन यामध्येच देवाचा वास असतो, त्याचप्रमाणे आपले शुद्ध कर्तव्य असेल तर परमेश्वराची कृपा प्राप्त होते असे मत ह भ प शिवाजी मोरे महाराजांनी व्यक्त केले.

स्वामी विवेकानंद यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्यामुळे आणखीच माझ्यावरील जबाबदारी वाढली असून भंडीशेगावच्या सार्वजनिक कामांमध्ये मी सातत्यने ग्रामस्थांच्या सहकार्याने सोबत राहणार असल्याचे मत पुरस्कार प्राप्त अजित कंडरे यांनी व्यक्त केले.

**पुरस्काराने जबाबदारी वाढते : अजित कंडरे**

गावांचा विकास झाला पाहिजे विद्यार्थ्यांचा खेळामध्ये असणारा प्रतिसाद आणि यश हे खूप चांगल्या प्रकारचे असून भंडीशेगाव ग्रामस्थांच्या कार्यास शुभेच्छा देत असून त्यांच्या सोबत कामात राहणार असल्याचे देखील कार्यक्रमाचे अध्यक्ष पुणे येथील उद्योजक सुरेश पाटील यांनी सांगितले.



यावेळी जिल्हा हिवताप कार्यालयाचा पदभार मिळाल्याबद्दल डॉ.एकनाथ बोधले यांचा सत्कार करण्यात आला, त्याचप्रमाणे नूतन जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी संतोष बागल व पंचायत समिती सदस्य नाना गोसावी यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन राजश्री कंडरे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक गंगाराम विभुते, भंडीशेगावच्या सरपंच सुमन येलमार, संजय रणखांबे, मनीषा येलमार, अलिश कंडरे, संजय अभ्यंकर, संजय येलपले,बाळासाहेब लोकरे,माजी उपसरपंच विजय पाटील, मंगेश ननवरे, अनिल जाधव, डॉ.अनिल कंडरे, निवृत्त मेजर ज्ञानेश्वर पाटील आदी उपस्थित होते.

# पुणे शिक्षक मतदारसंघातून महेश चिवटे तर पदवीधर मतदारसंघातून बी. पी. रोंगे यांची मोर्चेबांधणी सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुणे पदवीधर मतदारसंघ व पुणे शिक्षक मतदार संघाची मुदत जून २०२६ रोजी संपणार आहे यामुळे निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यातून करमाळ्याची सुपुत्र महेश चिवटे व पंढरपूरची सुपुत्र व प्राचार्य स्वीरी कॉलेजचे संस्थापक सचिव श्री बी.पी. रोंगे निवडणूक उतरणार असल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी निवडणुकीत महाविकास आघाडीची सत्ता होती. त्यामुळे कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले होते. मात्र इंद्राच्या निवडणुकीमध्ये माहीतुनी लक्ष केंद्रित केल्याची दिसून येत आहे. पुणे पदवीधर शिक्षक मतदार संघाची मुदत जून २०२६ रोजी संपणार आहे. त्यामुळे निवडणुकीत उभे राहण्याची तयारी श्री महेश चिवटे, सिरी कॉलेजचे प्राचार्य बी.पी. रोंगे यांनी सुरू केली आहे. त्यांनी शिक्षक व पदवीधर मतदार संघत नाव नोंदणी सुरुवात केली हसण्याची दिसून येत आहे. त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यांनी आपली मोर्चे पाणी सुरू केल्याची असल्याची पहावयास मिळत आहे शिक्षक मतदार संघात ५१ हजार, तर पदवीधर मतदारसंघात तीन लाख मतदार वाढले आहे.

---

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@gmail.com
जा.क्र.२०२६/अभिलेख/कावि/४७/२०२६ दि.०५/०३/२०२६

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

श्रीम. सना इस्माईल मुर्डी ) अर्जदार
रा. खैराट ता. अक्कलकोट
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ) सामनेवाला
ग्रामपंचायत, खैराट ता अक्कलकोट

ज्याअर्थी, यातील सना इस्माईल मुर्डी रा. खैराट ता. अकक्लकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०५/०१/१९९६ रोजी मौजे खैराट ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद है सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन सना इस्माईल मुडी नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०१७चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.०४/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि.०६/०३/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
तहसिलदार
अक्कलकोट

---

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@gmail.com
जा.क्र.२०२६/अभिलेख/कावि/४८/२०२६ दि.०५/०३/२०२६

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

श्रीम. मुन्नझा इस्माईल मुर्डी ) अर्जदार
रा. खैराट ता. अक्कलकोट
विरुध्द
जन्म मृत्यू नोदणी, कार्यालय ) सामनेवाला
ग्रामपंचायत, खैराट ता अक्कलकोट

ज्याअर्थी, यातील मुन्नझा इस्माईल मुर्डी रा. खैराट ता. अकक्लकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.१०/०३/१९९४ रोजी मौजे खैराट ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे, सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन मुन्नझा इस्माईल मुर्डी नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.०४/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास 'ही' नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि.०६/०३/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे

शिक्का

सही/-
तहसिलदार
अक्कलकोट

---

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@gmail.com
जा.क्र.२०२६/अभिलेख/कावि/४६/२०२६ दि.०५/०३/२०२६

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

श्रीम. नौशीन इस्माईल मुर्डी ) अर्जदार
रा. खैराट ता. अक्कलकोट
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ) सामनेवाला
ग्रामपंचायत, खैराट ता अक्कलकोट

ज्याअर्थी, यातील नौशीन इस्माईल मुर्डी रा. खैराट ता. अकक्लकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०६/०३/१९९३ रोजी मोजे खैराट ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन नौशीन इस्माईल मुर्डी नावाने जुन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.०४/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि.०६/०३/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
तहसिलदार
अक्कलकोट